लोकमत
हॅलो पुणे
पुणे, सोमवार, दि. १९ फेब्रुवारी २०१८

**तज्ज्ञांचा आशावाद : २१व्या शतकासमोरील आव्हाने; सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट**

# मनुष्याचा प्रवास संधीच्या वाटेवर

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : दगडावर दगड घासून अपघाताने ऊर्जा निर्माण झाली, गरजेपोटी लागलेल्या ऊर्जेच्या या शोधापासून मनुष्यजातीचा प्रवास सुरू झालेला आहे. गुहांमध्ये राहणाऱ्या पूर्वजांचे वंशज असलेले आपण विविध क्षेत्रांतील अनेक संधींच्या उंबरठ्यावर उभे असल्याचा आशावाद जागतिक स्तरावरील तज्ज्ञांनी व्यक्त केला.

सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि स्ट्रॅटेजिक फोरसाईट ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने '२१व्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया आणि स्ट्रॅटेजिक फोरसाईट ग्रुपचे वरिष्ठ कार्यकारी सल्लागार सचिन ईटकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, बीव्हीजी ग्रुपचे हणमंत गायकवाड, रामराजे नाईक निंबाळकर आदी मान्यवर उपस्थित होते. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सेंटर फॉर रिझोल्युशन ऑफ इंटरॅक्टेबल कॉनफ्लिक्टचे संचालक लॉर्ड ॲल्डर्डीस, स्लोव्हेनियाचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतता समितीचे प्रमुख डॉ. डॅनिलो टर्क बोस्निया, स्लोव्हेनियाचे डॉ. मुस्तफा सेरिक, मोरोक्कोच्या राजदूत डॉ. आसिया बेनसलाह अलोयी, नायजेरियाच्या राष्ट्राध्यक्षांचे मुख्य सल्लागार आयोडिल ॲडरीनवेल चर्चासत्रात सहभागी झाले.



सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि स्ट्रॅटेजिक फोरसाईट ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने '२१व्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावरील परिसंवादामध्ये बोलताना डॉ. आसिया बेनसलाह अलोयी, डॉ. डॅनिलो टर्क बोस्निया, लॉर्ड ॲल्डर्डीस, डॉ. मुस्तफा सेरिक.

लॉर्ड ॲल्डर्डीस म्हणाले, ''आज आपण दहशत आणि संधी यांच्या सीमारेषेवर आहोत. आपला प्रवास मनुष्यजातीच्या समूळ विनाशाकडे न्यायचा, की मनुष्यजातीच्या उत्क्रांतीकडे हे आजच्या तरुणांनीच ठरवायचे आहे. अणुयुद्धाच्या छायेत वावरणाऱ्या तरुणाईच्या सृजनशीलतेबाबत येणारी पिढी आणि या मागील पिढी आशेने पाहात आहे.'' डॉ. डॅनिलो टर्क म्हणाले, ''आज पाण्यासारख्या मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक स्रोताच्या दुर्भीक्षामुळे राष्ट्र-राज्य पातळीवर युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. नैसर्गिकरीत्या उपलब्ध असलेले पाणी प्रदूषित झाल्याने आपल्याला शुद्ध पाण्यासाठी पैसे मोजावे लागत आहेत, ते मोजूनही विकतचे पाणी शुद्ध आहेच याबाबत खात्री देऊ शकत नाही.'' डॉ. आसिया बेनसलाह अलोयी म्हणाल्या, ''सर्वांना परवडणाऱ्या दरात उच्चप्रतीचे शिक्षण उपलब्ध होणे गरजेचे आहे. शिक्षित समाजामुळे अनेक प्रश्न संपुष्टात येऊन मनुष्यामध्ये सुसंवाद आणि एकोपा वाढीस लागेल. आज श्रीमंत आणि गरीब त्यांच्यात्यांच्या परिस्थितीत तक्रारीच्याच स्वभावात असतात.''

www.maharashtratimes.com

मटा+TOI : पुण्यात नंबर १

# महाराष्ट्र टाइम्स

पुणे। शुक्रवार, १६ फेब्रुवारी २०१८ । पाने २२ (पुणे प्लससह) । शहर आवृत्ती । ₹ ४.००

सोनालीचा मास्

## विज्ञान तंत्रज्ञानावर उद्या कार्यशाळा

पुणे : विज्ञान तंत्रज्ञानाची अधिकाअधिक प्रगती आणि रोजच्या जीवनातील त्याचा वापर यामुळे सध्याचे मानवी जीवन हे एकाच वेळी संधी आणि धोके अशा दोन भिन्न टोकांवर येऊन ठेपले आहे. यानिमित्ताने २१ व्या शतकातील मानवी जीवनाचा आलेख मांडण्यासाठी उद्या शनिवारी १७ फेब्रुवारीला सायंकाळी साडेपाच वाजता '२१ व्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावर एका विशेष आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक प्रा. संजय चोरडिया यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या वेळी सचिन इटकर उपस्थित होते. बावधन येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिसंवादात सहभागी होणाऱ्या तज्ज्ञांशी आंतरराष्ट्रीय किर्तीचे व्याख्याते डॉ. संदीप वासलेकर संवाद साधणार आहेत. या परिसंवादात ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सेंटर फॉर रिझोल्युशन ऑफ इंटरॅक्टेबल कॉनफ्लिटचे संचालक लॉर्ड अॅल्डर्डिस, स्लोव्हेनियाचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतता समितीचे प्रमुख डॉ. डॅनिलो टर्क, बोस्निया आणि हर्जेगोव्हिनाचे डॉ. मुस्तफा सेरीक, मोरोक्कोच्या डॉ. आसिया बेनसलाह अलोयी मार्गदर्शन करणार आहेत.

सकाळ TODAY
सोमवार
१९ फेब्रुवारी २०१८
कमाल किमान
33.8°/13.7°

# विविध क्षेत्रांतील संधींचा तज्ज्ञांचा आशावाद

पुणे, ता. १८ : दगडावर दगड घासून अग्नीतून ऊर्जा निर्माण झाली. गारगोटी लागलेल्या ऊर्जेच्या या शोधापासून मनुष्य जातीचा प्रवास सुरू झाला आहे. गुहेमध्ये राहणाऱ्या पूर्वजांचे वंशज असलेले आपण आज विविध क्षेत्रांतील अनेक संधींच्या प्रवेशद्वारावर, उंबरठ्यावर उभे असल्याचा आशावाद विविध क्षेत्रांतील जागतिक स्तरावरील तज्ज्ञांनी 'एकविसाव्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावरील विशेष आंतरराष्ट्रीय परिसंवादात व्यक्त केला.

सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि स्ट्रॅटेजिक फोरसाइट ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, बीव्हीजी ग्रुपचे हणमंत गायकवाड, रामराजे नाईक निंबाळकर, इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष संजय चोरडिया, पुण्याचे वरिष्ठ कार्यकारी सल्लागार सचिन इटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सेंटर फॉर रिझोल्युशन ऑफ इंटरॅक्टेबल कॉन्फ्लिक्टचे संचालक लॉर्ड ॲल्डरडीस, स्लोव्हेनियाचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या सल्लागार समितीचे प्रमुख डॉ. डॅनिलो टर्क, बोस्निया आणि हर्झेगोविनाचे डॉ. मुस्तफा सेरीक, मोरोक्कोच्या राजपुत्र डॉ. आसिया बेनसालाह अलोयी, नायजेरियाच्या राष्ट्राध्यक्षांचे मुख्य सल्लागार आलोडिल ओडोलोकेल आदी यामध्ये सहभागी झाले होते. लेखक डॉ. संदीप वासलेकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

ॲडीओनवेल म्हणाले, "झपाट्याने बदलत जाणारे तंत्रज्ञान हेदेखील २१ व्या शतकासमोरील मोठे आव्हान आहे. तंत्रज्ञान मानवी आयुष्यावर आरूढ होत आहे. मनुष्यासाठी तंत्रज्ञान आहे की तंत्रज्ञानासाठी मनुष्य, असा प्रश्न पडतो. झपाट्याने बदलणाऱ्या या तंत्रज्ञानामुळे आपली शैक्षणिक व्यवस्थादेखील अनेक प्रश्नांच्या गर्तेत, संभ्रमावस्थेत सापडलेली दिसते. विद्यार्थी जे पारंपरिक शिक्षण घेऊन व्यावहारिक जगात येतो, तेव्हा ते शिक्षण वर्तमान काळातील आव्हाने पेलण्यास असमर्थ ठरते."

ॲल्डरडीस म्हणाले, "आपला प्रवास मनुष्य जातीच्या समूळ विनाशाकडे न्यायचा की मनुष्य जातीच्या उत्क्रांतीकडे हे आपल्याला ठरवायचे आहे. अणुयुद्धाच्या छायेत वावरणाऱ्या तरुणाईच्या मुक्ततेबाबत येणारी पिढी आणि या मागील पिढी आशेने पाहत आहे."

डॉ. टर्क म्हणाले, "नैसर्गिकरीत्या उपलब्ध असलेले पाणी प्रदूषित झाल्याने आपल्याला शुद्ध पाण्यासाठी पैसे मोजावे लागत आहेत. ते मोजूनही विकतचे पाणी शुद्ध आहेच याबाबत खात्री देऊ शकत नाही. हवा-पाणी प्रदूषण कमी करण्यावर आपला भर असला पाहिजे, नाहीतर शुद्ध हवेसाठी देखील भविष्यात युद्ध होतील."

डॉ. सेरीक म्हणाले, "डिजिटलायझेशनमुळे या समस्येवर काहीअंशी आपण मात करू शकतो. देशातील गरीब, दुर्गम भागात शिक्षणाची गंगा पोचविण्यासाठी डिजिटलायझेशनची मोठ्या प्रमाणात मदत होऊ शकते. डिजिटलायझेशनमुळे कमीत कमी किमतीत चांगल्या प्रतीच्या शिक्षणाची कवाडे आपण सर्वांसाठी उघडी करून देऊ शकतो."

प्रभात
Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
पुणे । सोमवार । दि. १९ फेब्रुवारी २०१८ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९/१९५७, वर्ष ८७, अंक : ४९



# मनुष्यजातीचा प्रवास विविध संधींच्या उंबरठ्यावर

## जागतिक तज्ज्ञांचा आशावाद : '२१ व्या शतकासमोरील आव्हाने' विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवाद

पुणे, दि.१८ - दगडावर दगड घासून अपघाताने ऊर्जा निर्माण झाली, गरजेपोटी लागलेल्या ऊर्जेच्या या शोधापासून मनुष्यजातीचा प्रवास सुरू झाला. गुहांमध्ये राहणाऱ्या पूर्वजांचे वंशज असलेले आपण आज विविध क्षेत्रातील अनेक संधींच्या प्रवेशद्वार, उंबरठ्यावर उभे असल्याचा आशावाद विविध क्षेत्रांतील जागतिक स्तरावरील तज्ज्ञांनी व्यक्त केला.



पुणे : सुर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे आंतरराष्ट्रीय परिसंवादात सहभागी तज्ज्ञांशी संवाद साधताना डॉ. संदीप वासलेकर.

सुर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि स्ट्रॅटेजिक फोरसाईट ग्रुपतर्फे '२१ व्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु नितीन करमळकर, संस्थेचे संस्थापक डॉ. संजय चोरडिया, बिल्हिनी ग्रुपचे हणमंत गायकवाड, रामराजे निंबाळकर, ग्रुपचे सचिन ईटकर आदी उपस्थित होते. परिसंवादात सहभागी झालेल्या तज्ज्ञांशी प्रसिद्ध लेखक डॉ. संदीप वासलेकर यांनी संवाद साधला. ऑक्सफर्ड विद्यापीठाचे लॉर्ड ॲल्डडीस, संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतता समितीचे प्रमुख डॉ. डॅनिलो टर्क, हर्जेगोव्हीनाचे, डॉ. मुस्तफा सेरीक, मोरोक्कोच्या राजदूत डॉ. आसिया अलोयी, नायजेरियाच्या राष्ट्राध्यक्षांचे मुख्य सल्लागार आयोबिल अॅड्रीनवेल सहभागी झाले होते. '२१ व्या शतकातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील आव्हानांचा वेध' या परिसंवादाच्या माध्यमातून घेण्यात आला.

लॉर्ड ॲल्डडीस म्हणाले, आज आपण दहशत आणि संधी यांच्या सीमारेषेवर आहोत. आपला प्रवास मनुष्यजातीच्या समूळ विनाशाकडे न्यायचा की मनुष्यजातीच्या उत्क्रांतीकडे हे आजच्या तरुणांनीच ठरवायचे आहे. अणुयुद्धाच्या छायेत वावरणाऱ्या तरुणाईच्या सृजनशिलतेबाबत येणारी पिढी आणि या मागील पिढी आशेने पाहत आहे.

डॉ. डॅनिलो टर्क म्हणाले, आज पाण्यासारख्या मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक स्रोतांच्या दुर्भिक्षामुळे राष्ट्र-राज्य पातळीवर युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. नैसर्गिकरीत्या उपलब्ध असलेले पाणी प्रदुषित झाल्याने आपल्याला शुद्ध पाण्यासाठी पैसे मोजावे लागत आहेत, ते मोजूनही विकतचे पाणी शुद्ध आहेच याबाबत खात्री देऊ शकत नाही. हवा-पाणी प्रदुषण कमी करण्यावर आपला भर असला पाहिजे, नाहीतर शुध्द हवेसाठी देखील भविष्यात युद्ध होतील आणि पैसे मोजावे लागतील अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

तरुणांमधल्या सकारात्मक ऊर्जेमुळे संभावीत धोक्यांतून आपण नक्कीच मार्ग काढू शकतो.

नियोजनबद्ध शिक्षण घेत असताना वास्तवात त्याच्या अंमलबजावणीची वेळ येते, तेव्हा ते शिक्षण कुचकामी ठरणार नाही, याची काळजी घेण्याचा सल्ला देखील तज्ज्ञांनी यावेळी दिला. प्रास्ताविक प्रा. डॉ. संजय चोरडिया यांनी केले, तर सचिन ईटकर यांनी आभार मानले.

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १२+८+CNX/८ = २८, किंमत : ₹ ४.००
पुणे, शुक्रवार, दि. १६ फेब्रुवारी २०१८

# 'एकविसाव्या शतकातील आव्हानां'वर विचारमंथन

## शनिवारी परिसंवाद : सूर्यदत्ता इन्स्टिट्यूटतर्फे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : विज्ञान-तंत्रज्ञानामुळे होत असलेली प्रगती आणि त्यामुळे निर्माण झालेल्या संधी तसेच त्यातील धोके, अशा दोन भिन्न टोकांवर जग येऊन ठेपले आहे. या पार्श्वभूमीवर सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने 'एकविसाव्या शतकातील आव्हाने' या विषयावर विचामंथन होणार आहे. त्यासाठी दि. १७ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

इन्स्टिट्यूटचे संस्थापक-अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया आणि स्ट्रॅटेजिक फोरसाईट ग्रुपचे वरिष्ठ कार्यकारी सल्लागार सचिन इटकर यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. बावधन येथील संस्थेत सायंकाळी साडेपाच वाजता हा परिसंवाद होईल. या परिसंवादात ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सेंटर फॉर रिझोल्युशन ऑफ इंटरॅक्टेबल कॉनफ्लिक्टचे संचालक लॉर्ड अॅल्डर्डीस, स्लोव्हेनियाचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतता समितीचे प्रमुख डॉ. डॅनिलो टर्क, बोस्निया आणि हर्जेगोव्हीनाचे डॉ. मुस्तफा सेरीक, मोरोक्कोच्या राजदूत डॉ. आसिया बेनसलाह अलोयी, नायजेरियाच्या राष्ट्राध्यक्षांचे मुख्य सल्लागार आयोडिल अॅडरीनवेल आदी सहभागी होणार आहेत. व्याख्याते आणि लेखक डॉ. संदीप वासलेकर त्यांच्याशी संवाद साधणार आहेत.

सकाळ
पुणे, शुक्रवार
१६ फेब्रुवारी २०१८
१०

# २१व्या शतकातील आव्हानांवर उद्या आंतरराष्ट्रीय परिसंवाद

पुणे, ता. १५ : एकविसाव्या शतकातील मानवी जीवनाचा आलेख मांडण्यासाठी शनिवारी (ता. १७) '२१ व्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावर एका विशेष आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया आणि स्ट्रॅटेजिक फोरसाईट ग्रुपचे वरिष्ठ कार्यकारी सल्लागार सचिन इटकर यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. बावधन येथे इन्स्टिट्यूटच्या आवारात होणाऱ्या या कार्यक्रमात व्याख्याते व लेखक डॉ. संदीप वासलेकर संवाद साधणार आहेत.

ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर रिझोल्युशन ऑफ इंटरॅक्टेबल कॉनफ्लिट'चे संचालक लॉर्ड ॲल्डर्डीस, स्लोव्हेनियाचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतता समितीचे प्रमुख डॉ. डॅनिलो टर्क, बोस्निया आणि हर्जेगोव्हीनाचे डॉ. मुस्तफा सेरीक, मोरोक्कोच्या राजदूत डॉ. आसिया बेनसलाह अलोयी, नायजेरियाच्या राष्ट्राध्यक्षांचे मुख्य सल्लागार आयोडिल ॲडरीनवेल आदी मान्यवर परिसंवादात सहभागी होणार आहेत.

मंगळवार, २० फेब्रुवारी २०१८ | वर्ष : ४ अंक : २८ | पृष्ठे १२ | मूल्य : ४.०० रुपये | ★★ पुणे आवृत्ती
संस्थापक संपादक :
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना

# मनुष्यजातीचा प्रवास आता अनेक संधींच्या उंबरठ्यावर!

पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) – दगडावर दगड घासून अपघाताने ऊर्जा निर्माण झाली. गरजेपोटी लागलेल्या ऊर्जेच्या या शोधापासून मनुष्यजातीचा प्रवास सुरू झाला आहे. आज विविध क्षेत्रांतील अनेक संधींच्या प्रवेशद्वारावर, उंबरठ्यावर उभे असल्याचा आशावाद विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी "२१व्या शतकासमोरील आव्हाने" या विषयावरील विशेष आंतरराष्ट्रीय परिसंवादात व्यक्त केला.

सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि स्ट्रॅटेजिक फोरसाइट ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया आणि स्ट्रॅटेजिक फोरसाइट ग्रुपचे वरिष्ठ कार्यकारी सल्लागार सचिन ईटकर, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू नितीन करमळकर, बीव्हीजी ग्रुपचे हणमंत गायकवाड, रमाराजे नाईक-निंबाळकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

लॉर्ड ॲल्डर्डीस म्हणाले, आज आपण धोक्यात आणि संधी यांच्या सीमारेषेवर आहोत. आपला प्रवास मनुष्यजातीच्या समूळ विनाशाकडे न्यायचा, की मनुष्यजातीच्या उत्क्रांतीकडे हे आजच्या तरुणांनीच ठरवायचे आहे. डॉ. डॅनिलो टर्क म्हणाले, आज पाण्यासारख्या मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक स्रोतांच्या दुर्भिक्ष्यामुळे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. नैसर्गिकरीत्या उपलब्ध असलेले पाणी प्रदूषित झाल्याने आपल्याला शुद्ध पाण्यासाठी पैसे मोजावे लागत आहेत, ते मोजूनही किमतीचे पाणी शुद्ध आहेच याबाबत खात्री देऊ शकत नाही. हवा-पाणीप्रदूषण कमी करण्यावर आपला भर असला पाहिजे. नाही तर शुद्ध हवेसाठीदेखील भविष्यात युद्ध होतील आणि पैसे मोजावे लागतील, अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

डॉ. आसिया बेनसलाह अलोवी म्हणाल्या, सर्वांना परवडण्याच्या दरात उच्चप्रतीचे शिक्षण उपलब्ध होणे गरजेचे आहे. शिक्षित समाजामुळे अनेक प्रश्न संपुष्टात येऊन मनुष्यांमध्ये सुसंवाद आणि एकोपा वाढीस लागेल. आज श्रीमंत आणि गरीब त्यांच्या परिस्थितीत तक्रारींच्याच स्वभावात असतात. तक्रारी करत बसण्यापेक्षा मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रामाणिक प्रयत्न होणे गरजेचे आहे.



'२१व्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावरील विशेष आंतरराष्ट्रीय परिसंवादात सहभागी तज्ज्ञांशी संवाद साधताना आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्याख्याते आणि प्रसिद्ध लेखक डॉ. संदीप वासलेकर.

सामना

# '२१ व्या शतकासमोरील आव्हाने' याविषयावर शनिवारी परिसंवाद

**पुणे :** '२१ व्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावर 'सूर्यदत्ता ग्रूप'तर्फे आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक प्रा. डॉ. संजय चोरडिया आणि स्ट्रॅटेजिक फोर साइट ग्रुपचे कार्यकारी सल्लागार सचिन इटकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. बावधान येथील 'सूर्यदत्ता'च्या आवारात शनिवारी (दि. १७) सायंकाळी हा परिसंवाद होणार असून, यात ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सेंटर फॉर रिझोल्युशन ऑफ इंटरॅक्टेबल कॉनफ्टिचे संचालक लॉर्ड ॲल्डडीस, स्लोव्हेनियाचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतता समितीचे प्रमुख डॉ. डॅनिलो टर्क, बोस्निया आणि हर्जेगोव्हिनाचे डॉ. मुस्तफा सेरीक, मोरोक्कोच्या राजदूत डॉ. आसिया बेनसलाह अलोयी, नायजेरियन राष्ट्राध्यक्षांचे मुख्य सल्लागार आयोडिल ॲंडरिनवेल हे सहभागी होणार आहेत. या सर्वांशी प्रसिद्ध लेखक डॉ. संदीप वासलेकर संवाद साधणार आहेत. २१ शतकातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील आव्हानांचा वेध या परिसंवादातून घेतला जाणार आहे, असे डॉ. चोरडिया यांनी सांगितले.

वर्ष : १३८
Regd. No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57
केसरी
राष्ट्रीय ठेवा
● अंक ४६ ● पृष्ठे : १० ● चार रुपये ● शुक्रवार, १६ फेब्रुवारी २०१८, पुणे C (शहर आवृत्ती)

# 'एकविसाव्या शतकासमोरील आव्हाने'वर आंतरराष्ट्रीय परिसंवाद

पुणे : विज्ञान तंत्रज्ञानाची अधिकाअधिक प्रगती आणि रोजच्या जीवनातील त्याचा वापर यामुळे सध्याचे मानवी जीवन हे एकाच वेळी संधी आणि धोके अशा दोन भिन्न टोकांवर येऊन ठेपले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर २१ व्या शतकातील मानवी जीवनाचा आलेख मांडण्यासाठी उद्या (शनिवार) रोजी २१ व्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन आले आहे, अशी माहिती सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया आणि स्ट्रॅटेजिक फोर साईट ग्रुपचे वरिष्ठ कार्यकारी सल्लागार सचिन इटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवारी सायंकाळी ५.३० वाजता बावधान येथील सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट येथे होणाऱ्या परिसंवादात प्रसिद्ध लेखक डॉ. संदीप वासलेकर संवाद साधणार आहेत. यावेळी संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतता समितीचे प्रमुख डॉ. डॅनिलो टर्क, हर्जेगोव्हीनाचे डॉ. मुस्तफा सेरीक, मोरोक्कोच्या राजदूत डॉ. आसिया बेनसलाह अलोयी, नायजेरियच्या राष्ट्राध्यक्षांचे मुख्य सल्लागार आयोडिल अॅडरीनवेल आदी मार्गदर्शन करणार आहेत.

शुक्रवार, 16 फरवरी 2018 आज का आनंद

# सूर्यदत्ता में अंतर्राष्ट्रीय परिसंवाद '21वीं सदी की चुनौतियां' कल

**पुणे, 15 फरवरी (आ.प्र.)**

अत्याधुनिक तकनीक का दैनिक जीवन में अत्यधिक उपयोग से मानव जीवन पर प्रभाव के मुद्दे में सुविधा एवं खतरा, दोनों शामिल हैं. 'सूर्यदत्ता' द्वारा इसी पृष्ठभूमि पर 21वीं सदी के मानव जीवन का लेखा-जोखा पेश करने के उद्देश्य से विशेष परिसंवाद का आयोजन किया गया है. 17 फरवरी को शाम 5.30 बजे बावधन कैम्पस स्थित हॉल में आयोजित परिसंवाद का विषय '21व्या शतकासमोरील आव्हाने' (21वीं सदी के समक्ष चुनौतियां) है. यह जानकारी सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इंस्टीट्यूट्स के संस्थापक अध्यक्ष प्रो. डॉ. संजय चोरड़िया ने दी.

प्रभात
प्रतीक प्रगल्भ्या महाराष्ट्राचे

# '२१ व्या शतकासमोरील आव्हाने' उलगडणार

पुणे, दि. १५ – एकविसाव्या शतकातील मानवी जीवनाचा आलेख मांडण्यासाठी येत्या शनिवारी (दि.१७) '२१ व्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद होत आहे. ही परिषद सायंकाळी साडेपाच वाजता सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, बावधान येथे होणार आहे. या परिसंवादाचे सूत्रसंचालन आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक डॉ. संदीप वासलेकर करणार आहेत. सूर्यदत्ता इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया आणि स्ट्रॅटेजिक फोरसाईट ग्रुपचे वरिष्ठ कार्यकारी सल्लागार सचिन ईटकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. परिसंवादात ऑक्सफर्ड विद्यापीठाचे लॉर्ड ॲल्डर्डीस, संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतता समितीचे प्रमुख डॉ. डॅनिलो टर्क, बोस्नियाचे डॉ. मुस्तफा सेरिक, मोरोक्कोचे राजदूत डॉ. आसिया बेनसलाह अलोयी, नायजेरियाचू मुख्य सल्लागार आयोडिल ॲडरीनवेल आदी मान्यवर सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहेत. यात विद्यार्थ्यांनाही सहभागी होता येणार असल्याचे डॉ. चोरडिया यांनी सांगितले.